विभागप्रमुखांमधून अभ्यासमंडळावर निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी Electoral Roll तयार करण्यासाठी माहिती पाठविण्याबाबत

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१**

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

**NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON–425001**

## निवडणूक शाखा

## विभाग प्रमुखांची अभ्यासमंडळावरील निवडणूक

## अधिसूचना

आपणास माहितच आहे की, महाराष्ट्र शासनाने दि. ०१ मार्च, २०१७ पासून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ लागू केलेला आहे. त्यातील कलम ४० (२) नुसार विविध अभ्यास मंडळाचे गठण करणे आवश्यक असून त्यातील उपकलम (ग) नुसार संलग्न महाविद्यालयातील व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील संबंधित विषयाच्या विभाग प्रमुखांच्या गटांमधून तीन विभाग प्रमुख निवडून द्यावयाचे आहेत. त्यादृष्टीने सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील विविध विषयांच्या विभाग प्रमुखांची यादी तयार करुन त्यातून संलग्न महाविद्यालय व परिसंस्था यांच्या विभाग प्रमुखांचा समावेश असलेला निर्वाचक गण (Electoral Roll) तयार करावयाचा आहे.

तरी सर्व संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक यांना विनंती करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील तरतुदींच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयात सुरु असलेल्या विविध विषयांच्या विभाग प्रमुखांची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेत स्थळावर www.nmu.ac.in./election या Link मध्ये विहित केलेल्या - नमूना अर्जामध्ये आवश्यक ती सर्व माहिती नमूद करुन त्याची प्रिंट काढून आवश्यक ते दस्तऐवज अर्जास लावून सर्व माहिती एकत्रितरित्या विद्यापीठास दिनांक ३०/०६/२०१७ रोजी किंवा त्यापूर्वी पोहोचेल अशा बेताने सादर करावी, ही विनंती.

प्रत्येक विभागप्रमुखांच्या अर्जासोबत खालील दस्तऐवज जोडणे आवश्यक आहे :

१) व्याख्याता/सहायक प्राध्यापक/प्रपाठक/सहयोगी प्राध्यापक/प्राध्यापक म्हणून विद्यापीठाच्या मान्यता पत्राची स्वयंस्वाक्षांकीत प्रत

पत्र पेटी क्र. : ८०, उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. ०२५७-२२५७२११, १२, १४ आणि २२५७३४८ फॅक्स क्र. : ०२५७-२२५८४०३, ४०६
Post Box No. : 80, Umavinagar, Jalgaon Telephone Nos. : 0257-2257211, 12, 14 and 2257348
Fax Nos. : 0257-2258403, 406 e-mail Id : registrar@nmu.ac.in and election2017@nmu.ac.in

२) विभागप्रमुख म्हणून नियुक्ती पत्राची स्वयंस्वाक्षांकीत प्रत

३) पदव्युत्तर केंद्रामधील मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापक असल्यास पदव्युत्तर अध्यापक म्हणून विद्यापीठाच्या मान्यता पत्राची स्वयंस्वाक्षांकीत प्रत

४) पदव्युत्तर केंद्रामधील मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापक असल्यास पदव्युत्तर अध्यापक म्हणून अनुभव प्रमाणपत्राची स्वयंस्वाक्षांकीत प्रत (एकूण पदव्युत्तर अध्यापक म्हणून अनुभवाचा उल्लेख)

वरीलप्रमाणे माहिती विहित मुदतीत विद्यापीठाच्या निवडणूक विभागात पाठवावी. ज्या महाविद्यालयाची/परिसंस्थेची माहिती विहित मुदतीत प्राप्त होणार नाही, त्या महाविद्यालयातील/परिसंस्थेतील विभाग प्रमुखांचे नाव संलग्न महाविद्यालय व परिसंस्था यांच्या विभाग प्रमुखांचा समावेश असलेला निर्वाचक गणामध्ये (Electoral Roll) समावेश होणार नाही, त्यास महाविद्यालय/परिसंस्था सर्वस्वी जबाबदार राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

कायदा/परिनियम/अधिसूचनेमधील कोणत्याही तरतुदीचा अर्थ काढण्यासंदर्भात विवाद निर्माण झाल्यास कायदा/परिनियम/अधिसूचनेची इंग्रजी प्रतीमधील तरतूद प्रमाण मानण्यात येईल.

कळावे,

15/6/17

(प्रा. अं. बा. चौधरी)
प्र. कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

सोबत : १) निदेश क्र.०६/२०१७ ची प्रत
२) विभाग प्रमुखांमधून अभ्यास मंडळावर निवडून द्यावयाच्या सदस्यांसंदर्भात तरतुदी व पात्रता शर्ती बाबतची प्रत.

जा.क्र.उमवि/२/निवडणूक/१५/२०१७
दिनांक: १५/०६/२०१७

प्रति,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांचे
मा.प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.

पत्र पेटी क्र. : ८०, उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र.०२५७-२२५७२११, १२, १४ आणि २२५७३४८ फॅक्स क्र.:०२५७-२२५८४०३, ४०६
Post Box No. : 80, Umavinagar, Jalgaon Telephone Nos. : 0257-2257211, 12 , 14 and 2257348
Fax Nos. : 0257-2258403, 406 e-mail Id : registrar@nmu.ac.in and election2017@nmu.ac.in

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम ४० (२) (ग) नुसार विभाग प्रमुखांमधून अभ्यास मंडळावर निवडून द्यावयाच्या सदस्यांसंदर्भात तरतुदी :-**

कलम २ (१४) : **"संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या विभाग प्रमुखांचा गट"** याचा अर्थ, संलग्न महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या विभाग प्रमुखांचा, जे संबंधित प्राधिकरणांचे सदस्य म्हणून त्यांच्यामधून निवडून येतील, त्यांचा समावेश असलेला निर्वाचक गण, असा आहे.

कलम २ (३१) : **"विद्यापीठ विभागाचा प्रमुख"**, **"परिसंस्थेचा प्रमुख"** आणि **"महाविद्यालय विभागाचा प्रमुख"** याचा अर्थ, परिनियमामध्ये विहित केल्याप्रमाणे अनुक्रमे विद्यापीठ विभागाचा प्रमुख, मान्यताप्राप्त परिसंस्थेचा प्रमुख आणि महाविद्यालय विभागाचा प्रमुख असा आहे.

कलम ४० (२) (ग) : **अभ्यास मंडळ**

संलग्न महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांच्या विभाग प्रमुखाच्या गटामधून निवडून द्यावयाचे संलग्न महाविद्यालयातील व मान्यताप्राप्त परिसंस्थेमधील तीन विभाग प्रमुख

**महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेतील "विद्यापीठाच्या अभ्यासमंडळाचा सदस्य सदस्य म्हणून निवडून येणाच्या पात्रता शर्ती :**

**कलम ४० (२) (ग) : अभ्यास मंडळ**

(क) प्राचार्य म्हणून दि.13 ऑक्टोबर 2000 पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवीधारक असावा,

(ख) पदवीपूर्वस्तरावरील एकूण किमान दहा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा,

(ग) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्ष केलेले असावे.

(प्रा. अं. बा. चौधरी)
प्र. कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

पत्र पेटी क्र. : ८०, उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र.०२५७-२२५७२११, १२, १४ आणि २२५७३४८ फॅक्स क्र. :०२५७-२२५८४०३, ४०६
Post Box No. : 80, Umavinagar, Jalgaon Telephone Nos. : 0257-2257211, 12 , 14 and 2257348
Fax Nos. : 0257-2258403, 406 e-mail Id : registrar@nmu.ac.in and election2017@nmu.ac.in